## **सद्‌गुरु सविंदर माऊलीची**

## **तर्ज़ : भर दे झोली मेरी या मोहम्मद**

सद्‌गुरु सविंदर माऊलीची

अशी आम्हाला प्रेरणा मिळाली

फक्त हो प्रेम ही प्रेम हृदयी

बुद्धिला ज्ञान चेतना मिळाली ||धृ||

ज्ञान तत्वे मिटो अंधकार

सारे प्रकाशाचे बनावे मिनार

सविंदरजींच्या बोधामृताने

प्रेमा भक्तीची साधना मिळाली।।१।।

सत्कार्याचा मनी चंग बांधा

असा खांद्याला लावून खांदा

पुढे नेऊ मिशन हरदेवाचे

सद्गति ही सद्भावना मिळाली ।।२।।

दोन वर्ष आणि दोन मास

घडविला आईने इतिहास

हरदेव वाणी ग्रंथ रूपाने

गुरुभक्ति ही जनजना मिळाली ।।३।।

निराकाराचा घ्या हो आधार

जीवन हो गुरूमतानुसार

एकनाथा हे वचन माताजींचे

अंगीकारण्याची धारणा मिळाली ।।४।।